**श्री.नामदेव दिगंबर कासले, कनिष्ठ लेखाधिकारी पंचायत समिती कर्जत यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेबाबत.**

अहिल्यानगर जिल्हा परिषद
अर्थ विभाग
आदेश क्रमांक अर्थ/कार्या-१/आस्था-१/४८३/२०२५
अहिल्यानगर दिनांक २८/११/२०२५

वाचाः-१.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील आदेश जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/३७८/२०२४ दिनांक ०७/११/२०२४

२.गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था-१/१५३२/२०२४ व त्यासोबत असलेले सहपत्र प्रथम खबर अहवाल व मा.विशेष न्यायालयाकडील आदेश.

३. इकडील ज्ञापन/दोषारोप पत्र क्रमांक अर्थ/कार्या-१/आस्था-१/२३०/२०२५ दिनांक १४/०७/२०२५

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र जा.क्रमांक कार्या-१/आस्था-१/८३४/२०२५ दिनांक ३१/०७/२०२५ अन्वये ज्ञापन/दोषारोप पत्राची सादर केलेली श्री.कासले यांची दिनांक २९/०७/२०२५ रोजीची पोहच.

५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र क्रमांक जा.क्र.कार्या-१/आस्था-१/१००७/२०२५ दिनांक २९/०८/२०२५ अन्वये सादर केलेला श्री.कासले यांचा दिनांक २९/०७/२०२५ रोजीचा खुलासा.

६. गटविकास अधिकारी,पंचायत समिती कर्जत यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था-१/११४६/२०२५ दिनांक २४/१०/२०२५ इकडेस प्राप्त दि.२९/१०/२०२५

७. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६ (३) व (५) नुसार.

ज्याअर्थी श्री.नामदेव दिगंबर कासले, कनिष्ठ लेखाधिकारी हे पंचायत समिती कर्जत या कार्यालयात कार्यरत असताना त्यांना लाचलुचपत प्रतिबंध प्रकरणी अटक करणेत आलेली होती. श्री.कासले यांनी सदरचे गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. श्री.नामदेव दिगंबर कासले, कनिष्ठ लेखाधिकारी हे जिल्हा परिषद कर्मचारी असून त्यांनी सदैव निरपवाद, सचोटीने वागणे व कर्तव्यपरायण असणे आवश्यक आहे. श्री.कासले यांनी कर्तव्याचे पालन न करुन गैरवर्तन केलेने संदर्भ क्रमांक १ अन्वये त्यांना पदावरुन तात्पुरते दूर करण्यात आलेले होते.

प्रस्तुत प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत यांचेकडील संदर्भ क्र.२ अन्वयेचे पत्रान्वये प्राप्त दोषारोप पत्र व त्यासोबत असलेले सहपत्र प्रथम खबर अहवाल व मा.विशेष न्यायालयाकडील आदेशाचे अवलोकन करुन त्याप्रमाणे संदर्भ क्रमांक ३ अन्वयेचे दोषारोप पत्र श्री.कासले यांना संदर्भ क्रमांक ४ अन्वये दिनांक २९/०७/२०२५ रोजी बजाविण्यात आलेले आहे व श्री.कासले यांना सदर दोषारोप पत्र प्राप्त झालेपासून १० दिवसांचे आत बचावाचे निवेदन सादर करणेबाबत फर्माविण्यात आलेले होते.

संदर्भ क्रमांक ५ अन्वये प्राप्त पत्रानुसार श्री.कासले यांनी सादर केलेले बचावाचे निवेदन इकडेस सादर करण्यात आलेले आहे.सदर बचावाचे निवेदनाप्रमाणे श्री.कासले यांनी त्यांचेविरुध्द बजावणेत आलेले आरोप अमान्य केलेले आहेत व संदर्भ क्रमांक ६ अन्वये गटविकास अधिकारी, पं.स.कर्जत यांनी सदरच्या बचावाचे निवेदनाबाबत असहमती दर्शविलेचे दिसून येत आहे.

त्यानुसार श्री.कासले यांनी त्यांचेविरुध्द निश्चित केलेले आरोप अमान्य केलेले असल्याने श्री.नामदेव दिगंबर कासले, कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती कर्जत यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (३) व (५) च्या तरतूदीनुसार खातेनिहाय विभागीय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे. व सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त,विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी),आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करणेत येत आहे. व्रिभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन **श्री.दिपक दिगंबर समुद्र, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती कर्जत, जिल्हा परिषद अहिल्यानगर** यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे.त्याप्रमाणे संदर्भ क्र. ३ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी. परिशिष्ट क्र.तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत आवश्यक कागदपत्रांचा तपशिल जोडला आहे. उक्त नमुद कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक २०२५११२८०५००६६ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 28-11-2025 17:12:31

**आनंद भंडारी** (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, अहिल्यानगर**

**प्रति,**

१. प्रतः-विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,विभागीय चौकशी (जि.प. कर्मचारी), नाशिक विभाग,नाशिक.सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते ६१.

२. श्री. दिपक दिगंबर समुद्र, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती कर्जत.
व्दारा व प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत, जिल्हा परिषद अहिल्यानगर
२/-सदर आदेशाची प्रत श्री.दिपक दिगंबर समुद्र, सहाय्यक प्रशासन अधिकारी, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्र.१ ते ६१.

३. श्री. नामदेव दिगंबर कासले, कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर.
व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर, जिल्हा परिषद अहिल्यानगर
२/-सदर आदेशाची प्रत श्री.कासले, कनिष्ठ लेखाधिकारी यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.